// तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in

**परिपत्रक/महत्वाचे**

**क्रमांक:** 2अ/एडीएम/जा वै प्रमाणपत्र/2018/1166
**दिनांक: 31.8.2018**

**विषय:-** शैक्षणिक वर्ष 2018-19 मधील पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमात प्रवेशित उमेदवारांचे विहित मुदतीतील जात वैधता व आवश्यकतेनुसार नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्राबाबत...

संदर्भ:- या संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक
1) 2अ/एडीएम/2018/872 दि. 12.07.2018
2) 2अ/एडीएम/2018/1080,दिनांक 14.8.2018
3) राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचे पत्र क्र.सीईटी सेल/तंत्र/जात वैधता/2018/1234 दि.31.8.2018

उपरोक्त विषयास अनुसरुन नमुद करण्यात येते की, संदर्भिय परिपत्रकान्वये शैक्षणिक वर्ष 2018-19 करिता पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता राखीव प्रवर्गातील उमेदवारांना जात वैधता व आवश्यकतेनुसार नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र सादर करण्यासाठी अंतिम तारीख निश्चित करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | जात वैधता प्रमाणपत्र व आवश्यकतेनुसार नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र सादर करण्यासाठीचा अंतिम दिनांक |
|---|---|---|
| 1 | प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी | 25.8.2018 |
| 2 | प्रथमवर्ष औषधनिर्माणशास्त्र व फार्म डी पदवी | 25.8.2018 |
| 3 | प्रथम वर्ष वास्तुशास्त्र पदवी | 25.8.2018 |
| 4 | प्रथम वर्ष हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेकनॉलॉजी पदवी | 25.8.2018 |
| 5 | प्रथमवर्ष एमबीए / एमएमएस पदव्युत्तर पदवी | 25.8.2018 |
| 6 | प्रथम वर्ष आणि थेट द्वितीय वर्ष एमसीए पदव्युत्तर पदवी | 25.8.2018 |
| 7 | प्रथम वर्ष एम.आर्च. पदव्युत्तर पदवी | 25.8.2018 |
| 8 | प्रथम वर्ष एम.एचएमसीटी पदव्युत्तर पदवी | 25.8.2018 |
| 9 | प्रथम वर्ष एम.फार्म पदव्युत्तर पदवी | 27.8.2018 |
| 10 | प्रथम वर्ष एम.ई./एम.टेक. | 27.8.2018 |
| 11 | थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदवी | 30.8.2018 |

| | | |
|---|---|---|
| १२ | थेट द्वितीय वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी | ३०.८.२०१८ |

त्याअनुषंगाने कळविण्यात येते की —

१. ज्या विद्यार्थ्यांनी वर नमुद अंतिम दिनांकापर्यंत संबंधित प्राधिकरणाने निर्गमित केलेले जात वैधता व आवश्यकतेनुसार नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र प्राप्त केले असुन काही तांत्रिक कारणास्तव संस्थेमार्फत या संचालनालयाच्या संकेतस्थळावर अपलोड केले नाहीत, अशा प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्यात येऊ नयेत.

२. ज्या विद्यार्थ्यांनी संबंधित मागासवर्गीय प्रवर्गातुन अर्ज सादर केला होता व त्यांना गुणवत्तेने General Open/All India/TFWS/Defence/Minority seat/ PWD seat या जागेवर प्रवेश मिळाला परंतु, वर नमुद अंतिम दिनांकापर्यंत संबंधित प्राधिकरणाने निर्गमित केलेले जात वैधता व आवश्यकतेनुसार नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र विद्यार्थ्याने सादर केले नाही, अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश संबंधित संस्थेने कॅटेगरी कन्व्हेशन फी रक्कम रु. २००/- (रक्कम रु. दोनशे फक्त) आकारुन खुल्या प्रवर्गामध्ये बदल करण्यात यावा व तसे संबंधित विद्यार्थ्यास लेखी निदर्शनास आणावे.

३. तसेच वर नमुद अंतिम दिनांकानंतरचे संबंधित प्राधिकरणाने निर्गमित केलेले जात वैधता व आवश्यकतेनुसार नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी सादर केले असल्यास, अशा विद्यार्थ्यांचे प्रवेशाबाबत संदर्भिय परिपत्रकान्वये नमुद केल्याप्रमाणे संस्थेने कार्यवाही करावी.

तसेच वर नमुद प्रवेशाबाबत संस्थेने विहित कालावधीत कार्यवाही केली नाही तर होणाऱ्या पुढील परिणामास संबंधित संस्था सर्वस्वी जबाबदार राहील, यांची नोंद घेण्यात यावी.

(डॉ. अभय वाघ)
संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई

प्रत:- **माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती,औरंगाबाद, मुंबई, नागपुर, नाशिक, पुणे यांना कळविण्यात येते की, वरील परिपत्रक आपल्या विभागाच्या अधिनस्त सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांना त्यांच्या सूचनाफलकावर दर्शनी भागात दिसेल अशा ठिकाणी प्रदर्शित करण्याबाबत कळविण्यात यावे.

२. कार्यासन क्रमांक ३,(माहिती तंत्रज्ञान शाखा), मुख्य कार्यालय, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे .